April 2025 E-ISSN : 2348-7143

International Research Fellows Association's

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue – 355 (B)

## Multidisciplinary Issue

**Guest Editor :**
Dr. Shivling Menkudale,
Principal,
Savitribai Phule Mahila Mahavidyalaya,
Satara, Dist-Satara [M.S.] INDIA

**Executive Editor :**
Dr. Dr. P. K. Tone

**Co-Editor :**
Dr. G. C. Khamkar
Dr. S. A. Gond

Chief Editor - Dr. Swati Lawange-Sonawane,

**Review Committee of this issue**

Prin. Dr. Shivling Menkudale
Dr. G. C. Khamkar
Dr. S. A. Waware
Ms. M. D. Jadhav
Dr. P. K. Tone
Dr. S. A. Gond
Mr. R. B. Kavitake
Mrs. S. G. Khamkar

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

*Cover Design Source : Internet

© All rights reserved with the authors & publisher

Price : Rs. 1000/-

| | | |
|---|---|---|
| 23 | अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान<br>डॉ. ए. बी. मुळीक | 131 |
| 24 | आर्थिक विकास : शाश्वत विकासाचा अभ्यास प्रा. हर्षदा काळे | 136 |
| 25 | हरित ऊर्जा : शाश्वत भविष्यासाठी एक दिशादर्शक मार्ग श्री. रामचंद्र कवितके | 140 |
| 26 | 5G संप्रेषण तंत्रज्ञानाची शेतीतील उपयुक्तता डॉ. तानाजी कुलाळ | 148 |
| 27 | सहकार क्षेत्रामधील अलीकडील प्रवाह डॉ. ऋतुजा कुलकर्णी | 151 |
| 28 | ग्रामीण भागाच्या विकासात सहकारी दुग्ध व्यवसायचे योगदान प्रा. एल. के पवार | 155 |
| 29 | भारतीय अर्थव्यवस्थेतील AI (कृत्रिम बुद्धिमत्ता)ची भूमिका प्रा. मोनिका जाधव | 162 |
| 30 | शाश्वत आर्थिक विकासामध्ये अक्षयक्षम ऊर्जेची भूमिका प्रा. चांगदेव शेळके | 169 |
| 31 | भारतीय शेतमजुरांच्या समस्या : एक अवलोकन<br>डॉ. शिवाजी झांझुरणे, डॉ. विजय पवार | 174 |
| 32 | भारतातील कृषी विपणन आणि किमान आधारभूत किंमत धोरणाचे विश्लेषण<br>डॉ. मोहन सदामते, कु. निकिता खराडे | 181 |
| 33 | चलनविषयक धोरणाबाबत उर्जित पटेल कमिटीच्या शिफारशी<br>श्री. निलेशकुमार गुरव | 190 |
| 34 | पश्चिम महाराष्ट्रातील भौगोलिक घटकांचा मराठ्यांच्या सामाजिक, आर्थिक जीवनावरील प्रभाव<br>रोहित चव्हाण, डॉ. शिवाजीराव भोसले | 198 |


*Our Editors have reviewed papers with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responsible, answerable and accountable for their content, citation of sources and the accuracy of their references and bibliographies/references. Editor in chief or the Editorial Board cannot be held responsible for any lacks or possible violations of third parties' rights. Any legal issue related to it will be considered in Yeola, Nashik (MS) jurisdiction only.*

***- Chief & Executive Editor***

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue 355 (B) : Multidisciplinary Issue
Impact Factor : 6.625(SJIF)
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
April 2025

# अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान

डॉ. ए. वी. मुळीक
सहाय्यक प्राध्यापक, अर्थशास्त्र विभाग वेणूताई चव्हाण कॉलेज, कराड

**प्रस्तावना :**

भारताची अर्थव्यवस्था ही जगातील बहुचर्चित अर्थव्यवस्थांपैकी एक आहे. आज भारताची अर्थव्यवस्था 5 ट्रिलियन च्या दिशेने वाटचाल करत असून जागतिक क्रमवारीत पहिल्या 3 मध्ये येऊ पाहत आहे. अर्थात भारत हा आर्थिक महासत्तेकडे वाटचाल करत असलेला देश आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेचा हा प्रवास जागतिक पातळीवर भारताचे वेगळेपण सिद्ध करणारा आहे. कारण भारत हा देश ब्रिटिश सत्तेच्या अधीन अनेक वर्ष अडकून पडला होता. अनेक वर्षांच्या संघर्षानंतर भारताला स्वातंत्र्य मिळाले. तेव्हापासून आज पर्यंत भारताची अर्थव्यवस्था प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत आहे. या दरम्यानच्या कालखंडात भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक स्थित्यंतरे दिसून येतात. त्यांपैकी भारतीय अर्थव्यवस्थेत 1991 चे नवीन आर्थिक धोरण हा झालेला बदल क्रांतिकारक असल्याचे दिसून येते. कारण नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेचत संरचनात्मक, संस्थात्मक व दृष्टीकोनात्मक बदल झाला परिणामी भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूप, व्याप्ती व दिशा यामध्ये व्यापक असे परिवर्तन झालेले आहे. याचे श्रेय तत्कालीन सरकार, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक आणि विविध भारतीय तज्ञ, धोरणकर्त्यांना, लोकप्रतिनिधींना आणि देशातील नागरिकांना जाते, यापैकी अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग हे एक आहेत.

डॉ. मनमोहन सिंग हे जगप्रसिद्ध भारतीय अर्थशास्त्रज्ञ म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांना भारताच्या नवीन आर्थिक धोरणाचे शिल्पकार म्हणून ओळखले जाते. या दृष्टिकोनातून डॉ. मनमोहन सिंग यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान महत्त्वपूर्ण आहे हे अभ्यासण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधासाठी अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान' हा विषय निवडलेला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

1) भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीची वाटचाल अभ्यासणे.
2) अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचा जीवन परिचय अभ्यासणे.
3) भारतीय अर्थव्यवस्थेतील डॉ. मनमोहन सिंग यांचे योगदान अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत विषयाच्या संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग करण्यात आला असून माहिती संकलनासाठी द्वितीय साधनसामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. या अंतर्गत डॉ. मनमोहन सिंग यांचे स्वलिखित ग्रंथ, चरित्र, संदर्भ ग्रंथ, पुस्तके,लेख, शोध निबंध,वर्तमानपत्र व विविध वेबसाईट इत्यादी साधनांचा वापर केला आहे.

**विषय स्पष्टीकरण :**

प्रस्तुत विषयाच्या स्पष्टीकरणांमध्ये भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीची वाटचाल, अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचा जीवन परिचय, भारतीय अर्थव्यवस्थेतील डॉ.मनमोहन सिंग यांचे योगदान इत्यादी घटकांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

**भारतीय अर्थव्यवस्थेच्या प्रगतीची वाटचाल :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अनेक नवनवीन उपक्रम, धोरणे व योजना राबवल्या गेल्या. देशाचा नियोजनबद्ध विकास करता यावा म्हणून नियोजन आयोगाची स्थापना केली, विकास परिषदेची स्थापना केली, पंचवार्षिक योजनांची सुरुवात केली. या पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून कृषी, उद्योग, सिंचन, मानव संसाधन, ग्रामीण विकास, तंत्रज्ञान, सर्वसमावेशक विकास, शाश्वत विकास, शाश्वत विकास व जलद वृद्धी इत्यादी क्षेत्रात प्रगती करण्यासाठी भर दिला गेला. औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीसाठी नवनवीन औद्योगिक धोरणे राबवली. कृषी क्षेत्राच्या प्रगतीसाठी हरितक्रांती तसेच श्वेतक्रांती, निळी क्रांती, पिवळी क्रांती इत्यादी सुधारणा द्वारे अर्थव्यवस्थेमध्ये अमुलाग्र असे बदल घडून आणले असल्याचे दिसून येते. अर्थव्यवस्थेत केलेल्या बदलामुळे अर्थव्यवस्थेची प्रगतीची वाटचाल सुरू झाल्याचे आपणास दिसून येते, परंतु या दरम्यानच्या कालखंडात अर्थव्यवस्थेमध्ये अनेक समस्या उदभवल्याचे आपल्याला दिसून येतात. उदाहरणार्थ दारिद्र्य, बेरोजगारी, भाववाढ, विषमता इत्यादी सारख्या समस्यांनी वर डोके काढल्याचे दिसून येते. त्यातच राजकोषीय तूट वाढत गेली, कर्ज वाढत गेले. परिणामी व्याजाची देणी वाढली आयाती चे मूल्य वाढून निर्याती चे मूल्य कमी झाले त्यामुळे व्यापारशेषात तूट निर्माण झाली. परिणामी विदेशी गंगाजळीचा साठा कमी झाला. देशाच्या व्यवहार शेषात तूट निर्माण झाली. वर्षानुवर्ष ही तूट वाढत चालली. अगोदरच कर्ज वाढल्यामुळे विदेशी कर्ज मिळवणे कठीण झाले याच दरम्यान देशात भाववाढ, विषमता, दारिद्र्य बेरोजगारी, पेट्रोल डिझेलच्या वाढत्या किमती, आखाती देशातील युद्ध इत्यादी समस्यांनी अकराळ विक्राळ रूप धारण केले परिणामी भारतीय अर्थव्यवस्था एका गंभीर दुष्टचक्रामध्ये अडकून पडल्याचे दिसून येते. यातून मार्ग काढण्यासाठी तत्कालीन धोरणकर्त्यांनी 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. त्यानंतर भारताच्या अर्थव्यवस्थेत संरचनात्मक संस्थात्मक व दृष्टिकोनात्मक बदल झाले असून भारतीय अर्थव्यवस्थेने आजवर विविध क्षेत्रात प्रगती साध्य केली असून आंतरराष्ट्रीय पातळीवर आपल्या अर्थव्यवस्थेची एक वेगळी ओळख निर्माण केली असल्याचे दिसून येते.

**अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांचा जीवन परिचय :**

सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ म्हणून जगभर प्रसिद्ध असणारे डॉ. मनमोहन सिंग यांचा जन्म 26 सप्टेंबर 1932 रोजी पंजाब (पाकिस्तान) तत्कालीन भारतातील गाह या गावी एका मध्यमवर्गीय शीख कुटुंबात झाला. भारत पाकिस्तान फाळणीनंतर त्यांचे कुटुंब भारतात वास्तव्यास आले. सिंग यांचे प्रारंभिक शिक्षण गरीबी मध्ये उर्दू भाषेतून पाकिस्तान मध्ये झाले. त्यानंतर पुढील शिक्षण त्यांनी भारतात येऊन व नंतर विदेशात जाऊन घेतले असल्याचे दिसून येते. त्यांनी 1954 मध्ये पंजाब विद्यापीठामधून एम. ए. अर्थशास्त्राची पदवी प्राप्त केली. त्यानंतर 1957 मध्ये केंब्रिज विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात प्रथम श्रेणीतून ओनर्सची पदवी प्राप्त केली. 1962 मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात डॉक्टरेटची पदवी प्राप्त केली. 1971 मध्ये भारत सरकारच्या वाणिज्य मंत्रालयामध्ये आर्थिक सल्लागार म्हणून काम केले. मनमोहन यांची संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यापार आणि विकास परिषदेच्या समितीच्या सदस्य पदी निवड करण्यात आली होती. 1972 मध्ये त्यांनी भारत सरकारच्या वित्त मंत्रालयाचे आर्थिक सल्लागार म्हणून कार्य केले. 1976 मध्ये वित्त मंत्रालयाचे सचिव म्हणून कार्य केले. 1980 ते 1982 या कालावधीत त्यांनी योजना आयोगाचे सदस्य म्हणून काम केले. 1982 मध्ये भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर म्हणून त्यांनी यशस्वीरित्या काम

पाहिले. 1985 ते 1990 एकूण पाच वर्ष योजना आयोगाचे उपाध्यक्ष म्हणून काम केले. 1990 मध्ये त्यांना पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार म्हणून कार्य करण्याची संधी मिळाली.

1991 मध्ये भारत आर्थिक संकटात अस्ताना पंतप्रधान पी. व्ही. नरसिंहराव यांनी डॉ. मनमोहन सिंग यांना आपल्या मंत्रिमंडळात वित्तमंत्री म्हणून कार्य करण्याची जबाबदारी दिली. त्याचबरोबर त्यांनी शिक्षण क्षेत्रात ही उल्लेखनीय कार्य केलेले आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलेले आहे. त्याचबरोबर अर्थशास्त्रातील शिक्षण घेण्याबरोबरच अर्थशास्त्राचे अध्यापक म्हणूनही कार्य केलेले आहे. पंजाब विद्यापीठात त्यांनी अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य केले. तसेच त्यांनी दिल्ली विद्यापीठातही अर्थशास्त्राचे प्राध्यापक म्हणून कार्य केले असल्याचे दिसून येते. महत्त्वाचे म्हणजे त्यांनी भारताचे पंतप्रधान म्हणून 2004 पासून 2014 पर्यंत कार्य केले. डॉ. मनमोहन सिंग यांना त्यांनी केलेल्या कार्याबद्दल विविध पदव्या व पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. 2006 मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठ आणि केंद्रीय विद्यापीठाने डॉक्टर ऑफ सिव्हिल लॉ ही पदवी त्यांना दिली. 2008 मध्ये बनारस हिंदू विद्यापीठाने डॉक्टर ऑफ लेटर्स ही पदवी दिली. मॉस्को स्टेट इन्स्टिट्यूट ऑफ इंटरनॅशनल रिलेशन यांच्यावतीने मानद डॉक्टरेट त्यांना मिळाली. सेंट जॉन्स कॉलेज केंब्रिज द्वारे डॉक्टर मनमोहन सिंग शिष्यवृत्ती सुरू करण्यात आली. 2017 मध्ये त्यांना शांतता, नि:शस्त्रीकरण आणि विकासासाठी इंदिरा गांधी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. अशा या बहुआयामी, तज्ज्ञ, मितभाषी, कार्य कुशल कार्य हीच आपली ओळख असणाऱ्या डॉ.मनमोहन सिंग यांचे 26 डिसेंबर 2024 रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या जाण्याने भारतासह संपूर्ण जगाने एक चांगले अर्थतज्ज्ञ गमावल्याच्या प्रतिक्रिया जगभरातून आल्याचे दिसून आले. त्यांच्याविषयी विदेशातून आलेल्या प्रतिक्रिया हीच त्यांच्या कार्याची पोचपावती आहे.

थोडक्यात, डॉ.मनमोहन सिंग हे एका गरीब मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला येऊन उच्च शिक्षण व गुणवत्ता प्राप्त करून आर्थिक क्षेत्रात विविध पदावर कार्य करणारे कुशल प्रशासक विकासाभमुख व्यक्तिमत्व असणारे जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ होते हे त्यांच्या कार्यावरून व त्यांच्या जीवनप्रवासावरून दिसून येते.

**डॉ.मनमोहन सिंग यांचे भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान :**

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा विकास हा त्या देशातील नैसर्गिक संसाधने, मानवी भांडवल, आंतरराष्ट्रीय संबंध तसेच देशातील विचारवंत, शास्त्रज्ञ, तज्ञ अभ्यासक, विवेकशील नागरिक व धोरणकर्त्यांच्या कार्यावर, निर्णयावर आणि धोरणांच्या अंमलबजावणीवर अवलंबून असतो. डॉ.मनमोहन सिंग हे भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर, नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष, भारताचे अर्थमंत्री व पंतप्रधान इत्यादी उच्च पदावर काम करणारे आणि जगविख्यात अर्थतज्ज्ञ म्हणून प्रसिद्ध असणारे व्यक्तिमत्व होते. त्यांनी या विविध पदावरून कार्य करत असताना घेतलेले निर्णय आखलेल्या योजना राबवलेले कार्यक्रम यातून त्यांचे राष्ट्र निर्मितीच्या कार्यातील अर्थात भारतीय अर्थव्यवस्थेतील योगदान महत्वपूर्ण असल्याचे दिसून येते. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये स्वातंत्र्यप्राप्तीनंतर विकासाचे वारे वाहू लागले अर्थव्यवस्थेची प्रगती होऊ लागली त्या दरम्यान काही समस्या उद्भवल्या 90 च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्था संकटाच्या चक्रात अडकली या चक्रातून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी अर्थमंत्री व नंतर पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी जे कार्य केले ते उल्लेखनीय व महत्वपूर्ण कार्य असल्याचे दिसून येते.

डॉ.मनमोहन सिंग यांनी योजना आयोगाचे सदस्य व नंतर उपाध्यक्ष म्हणून केलेले कार्य महत्वपूर्ण होते. त्यांनी नियोजन आयोगात काम करताना अनेक नवनवीन धोरणे व योजना आणल्याचे दिसून येते, तसेच त्यांनी भारतीय

रिझर्व बँकेचे गव्हर्नर म्हणूनही उल्लेखनीय कार्य केल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे डॉ. मनमोहन सिंग यांनी संकटकाळात भारताचे अर्थमंत्री म्हणून जे कार्य केले त्या कालखंडाला 'मनमोहन युग' म्हणून ओळखले जात आहे. कारण या कालखंडामध्ये त्यांनी भारतावर आलेले आर्थिक संकट या संकटातून भारतीय अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान मा. पी. व्ही. नरसिंहराव आणि त्यांच्या सरकारने आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँकेच्या सल्ल्यानुसार जो सुधारणात्मक कार्यक्रम राबविला त्यामध्ये अर्थमंत्री म्हणून डॉ. मनमोहन सिंग हे अग्रस्थानी होते. अर्थात डॉ. मनमोहन सिंग यांनी 1991 मध्ये नवीन आर्थिक धोरणाअंतर्गत उदारीकरण, खाजगीकरण व जागतिकीकरण (LPG) हा नवीन सुधारणात्मक कार्यक्रम राबविला. उदारीकरणाअंतर्गत विविध उद्योगांसाठी परवाना पद्धत काढून टाकली, ज्यामुळे अधिक स्पर्धा आणि नावीन्यपूर्णतेचा मार्ग मोकळा झाला. खाजगीकरणाअंतर्गत प्रमुख उद्योगांमधील सरकारी नियंत्रण कमी करून, खाजगी क्षेत्राच्या सहभागास प्रोत्साहन दिले. जागतिकीकरणाअंतर्गत भारताला परदेशी गुंतवणूक आणि व्यापारासाठी खुले केले, राष्ट्राला जागतिक अर्थव्यवस्थेसी संलग्नित करण्याची प्रक्रिया राबवली.

थोडक्यात भारतात राबवलेल्या नवीन आर्थिक धोरणामुळे भारतीय अर्थव्यवस्थेत संरचनात्मक संस्थात्मक व दृष्टिकोनात्मक बदल झाल्याचे आपणास दिसून येते. या बदलाचे भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावर काही अनुकूल तर काही प्रतिकूल परिणाम झाल्याचे दिसून येते.

डॉ. मनमोहन सिंग यांनी 2004 ते 2014 या दहा वर्षाच्या कालावधीत देशाच्या पंतप्रधान पदाची सूत्र सांभाळली. या पदावरून कार्य करत असताना त्यांनी जनकल्याणाच्या विविध लोक कल्याणकारी योजना राबवल्याचे दिसून येते. तसेच कृषी, उद्योग, सेवा या बरोबर सर्वसमावेशक विकास, शाश्वत विकास, जलद आर्थिक विकास, पर्यावरण संरक्षण व संवर्धन यासारख्या क्षेत्रातही अमुलाग्र असे बदल केल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे त्यांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना कर्जपुरवठ्यासाठी क्रेडिट गॅरंटी फंड ट्रस्ट योजना सुरू केली. या योजनेमुळे देशातील हजारो लहान व्यवसाय मालकांना सशक्त केले, ज्यामुळे उत्पादन वाढवण्यास आणि नोकऱ्या निर्माण करण्यास ते सक्षम झाले असल्याचे दिसून येते. तसेच सूक्ष्म लघु व मध्यम उद्योगांची उत्पादकता वाढवण्यासाठी आणि त्यांची जागतिक स्पर्धात्मकता सुधारण्यास मदत करण्यासाठी राष्ट्रीय उत्पादन स्पर्धात्मकता कार्यक्रम सुरू करण्यात आला.

ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी विशेषता ग्रामीण भागातील लोकांच्या हाताला काम मिळण्यासाठी त्यांनी ग्रामीण रोजगार निर्मिती कार्यक्रम (REGP) आणि पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) या सारख्या उपक्रमांद्वारे स्वावलंबनाला प्रोत्साहन दिले. या योजनांनी समतोल प्रादेशिक विकासाला चालना देऊन ग्रामीण उद्योजकांना आर्थिक आणि पायाभूत सुविधा पुरवण्यास मदत केल्याचे दिसून येते. सर्व क्षेत्रात त्यांनी जलद सर्वसमावेशक विकास व्हावा म्हणून कौशल्य विकास व तंत्रज्ञान आधारित उपक्रम राबवण्यावर भर दिला असल्याचे दिसून येते.

**सारांश :**

अर्थतज्ज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेला संकटातून बाहेर काढण्यासाठी उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण आणले विदेशी गुंतवणुकीचे अडथळे दूर केले देशातील शुल्क आणि कर कमी केले. निर्यात सबसिडी रद्द केली, औद्योगिक परवाना रद्द केला, 1991 चा अर्थसंकल्प मांडला या अर्थसंकल्पाने देशाच्या आर्थिक सुधारणा आणि उदारीकरणाला खऱ्या अर्थाने वाट मोकळी करून दिली भारतीय बाजारपेठेच्या

विस्तारीकरणाला बळ दिले देशाचा विकासदर 8 ते 9 टक्के हा ऐतिहासिक दर गाठला विशेषतः सर्वाधिक वेगाने वाढणारी भारतीय अर्थव्यवस्था म्हणून भारतीय अर्थव्यवस्थेची जगात ओळख निर्माण करून दिली. 2007 मध्ये भारताचा सर्वाधिक 9 टक्के विकासदराची नोंद करत भारताने जगातील दुसरी सर्वात वेगाने वाढणारी प्रमुख अर्थव्यवस्था म्हणून जगात ओळख निर्माण केली. भारताचे विदेशी संबंध वाढविले. विविध पदावरून पाय उतार झाल्यानंतरही त्यांनी राष्ट्राच्या कल्याणासाठी आयुष्याच्या अखेरपर्यंत वेळोवेळी गरजेनुसार सरकारला सल्लावजा सूचना केल्याचे आपल्याला दिसून येते. यातून डॉ. मनमोहन सिंग यांच्या विकास विषयक कार्याची व राष्ट्राप्रती असलेल्या भावनेची उंची वाढल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

वरील अभ्यासावरून खालील निष्कर्ष काढण्यात आलेले आहेत.

1. डॉ.मनमोहन सिंग हे एका गरीब मध्यमवर्गीय कुटुंबात जन्माला आले असून त्यांनी उच्च शिक्षण व गुणवत्ता प्राप्त करून आर्थिक क्षेत्रात विविध पदावर कार्य करणारे कुशल प्रशासक, धोरणकरते विकास पुरुष व जगप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ होते हे त्यांच्या कार्यावरून व त्यांच्या जीवनप्रवासावरून दिसून येते.
2. भारत देशाच्या अर्थव्यवस्थेच्या प्रगतीमध्ये नियोजन आयोगाचे सदस्य व उपाध्यक्ष तसेच भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर, अर्थमंत्री पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांचे कार्य महत्वपूर्ण असल्याचे स्पष्ट होते.
3. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय अर्थव्यवस्थेची प्रगती होऊ लागली असून दरम्यान काही समस्या उद्भवल्या असल्याचे दिसून येते. विशेषतः 90 च्या दशकात भारतीय अर्थव्यवस्था संकटाच्या चक्रात अडकली या चक्रातून अर्थव्यवस्थेला बाहेर काढण्यासाठी अर्थमंत्री व नंतर पंतप्रधान म्हणून डॉ. मनमोहन सिंग यांनी जे कार्य केले ते उल्लेखनीय व महत्वपूर्ण आहे.

**शिफारसी :**

डॉ. मनमोहन सिंग यांनी जीवनभर केलेले कार्य उल्लेखनीय असून भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये एक वेगळी ओळख निर्माण करणारे होते त्यांनी दिलेली धोरणे, आखलेल्या योजना आजही भारतीय अर्थव्यवस्थेला विकसित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरत आहेत त्यामुळे अभ्यासक्रमामध्ये डॉ. मनमोहन सिंग यांच्या आर्थिक विचारांचा आणि अर्थव्यवस्थेतील विकासासाठीच्या योगदानाचा समावेश करणे आवश्यक आहे.

**संदर्भ :**

1. कहाते अतुल (2022) मनमोहन सिंह भारताच्या आधुनिक अर्थव्यवस्थेचे जनक मनोविकास प्रकाशन पुणे.
2. शास्त्री सुजय (2015) डॉ. मनमोहन सिंह एक वादळी पर्व ग्रंथाली प्रकाशन, मुंबई.
3. Indian Express 27, December 2024
4. https://www.esakal.com/desh/manmohan-singh-birthday-turning-point-of-the-indian-economy-srs97
5. https://frontline.thehindu.com/other/obituary/tribute-former-prime-minister-manmohan-singh-upa-indo-us-nuclear-deal-architect-of-indias-economic-reforms-sonia-gandhi-bjp-criticism-pv-narasimha-rao/article69032013.ece